# कायदेविषयक मदत आणि तुम्ही

## 1 कायदेविषयक मदत म्हणजे काय

जे आरोपी गरीब, गरजू आहेत आणि न्यायालयीन प्रक्रियेचा अथवा वकिल करण्यास सक्षम नाहीत, अशा आरोपींना मोफत कायदेविषयक सेवा पुरविणे.



## 2 बंदी कायदेविषयक मदतीस पात्र आहेत काय

होय, न्यायाधिन अथवा पोलिस कोठडीतील कोणतीही व्यक्ती कायदेविषयक सेवा अधिनियम १२ (जी) कलमांर्तगत मोफत कायदेविषयक मदतीस पात्र आहे.

## 3 मोफत कायदेविषयक मदतीसाठी कोणाशी संपर्क साधावा

तुम्ही ह्यांना विनंती करु शकता-

१. ज्या न्यायालयात तुम्हाला हजर केले जाते त्या न्यायाधिशांना
२. कोठडीत असल्यास संबंधित अधिका-यांना
३. वरीष्ठ दिवाणी न्यायाधिश ज्यांना मंडळ/तालुका स्तरावर अध्यक्ष म्हणुन नेमण्यात आलेले आहे.
४. राज्य स्तरावरील राज्य विधी सेवा प्राधिकरण सचिव
५. जिल्हा स्तरावरील विधी सेवा प्राधिकरण सदस्य सचिव
६. राज्य स्तरावरील उच्च न्यायलय विधी सेवा समिती सचिव
७. केंद्र स्तरावरील सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती सचिव

## 4 कायदेविषयक मदतीमध्ये कोणत्या सेवा उपलब्ध आहेत

१. तुमच्या विरूध्द खटल्यामध्ये किंवा अपिलाची न्यायालयात तुमच्या वतीने बाजू मांडणा-या (प्रतिनिधीत्व करणा-या) वकीलाची सेवा .
२. न्यायालयीन व इतर प्रक्रियेची फी अदा करणे.
३. कोणत्याही कायदेशिर प्रक्रियेची तयारी करणे, मसूदा तयार करणे व दाखल करणे याबाबतची फी.
४. विधी व्यावयासीक किंवा विधी सल्लागार (वकील) यांची फी.
५. नियम, न्याय-निर्णय, आदेश किंवा कोणत्याही कायदेविषयक प्रक्रियेशी संबंधीत कागदपत्रे प्राप्त करण्याचा खर्च.
६. कागदपत्रे, भाषांतर, छपाई इ. चा खर्च.



## 5 कायदेविषयक मदतीसाठी अर्ज करण्याची पध्दत-



१. वरील नमुद अधिका-यांकडे लेखी अर्ज सादर करु शकता.
२. एखादी व्यक्ती निरक्षर असल्यास विधी सेवा प्राधिकरण यांनी त्या व्यक्तीच्या अंगठयाच्या निशाणासह त्याचे लिहून घेतलेले बयाण अर्ज म्हणून स्विकारले जाईल.



## 6 कायदेविषयक मदत कोण करतं

विधी सेवा प्राधिकरण (Legal Aid) कायदेविषयक मदत पुरवते. उदा.

१. उपविभागीय विधी सेवा प्राधिकरण (SDLSA)/ तालुका सेवा समिती (TCSC)
२. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (DLSA)
३. राज्य विधी सेवा प्राधिकरण (SLSA)आणि उच्च न्यायालय विधी सेवा समिती (HCLSC)
४. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (NALSA)आणि सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती (SCLSC)

## 7 कायदेविषयक मदत घेणा-या व्यक्तीची कर्तव्ये-

१. सचिव विधी सेवा प्राधिकरण यांनी दिलेले निर्देश पाळणे.
२. तुमच्या वकीलास तुमच्या खटल्याविषयी पूर्ण सत्य सांगणे.
३. तुम्हाला नेमून दिलेल्या वकीलास कोणत्याही प्रकारची फी अथवा खर्च देवू नये.
४. शक्य असेल तेव्हा कुटुंबातील सदस्यांना समितीच्या कार्यालयात, कोर्टात किंवा तुम्हाला नेमुन दिलेल्या वकीलाची भेट घेण्यास पाठविणे.



## 8 कायदेविषयक मदत पुरविण्याची खात्री करणेसाठी पोलिस व कोर्टाची कर्तव्ये-

अ. आरोपीस त्याचा वकील प्राप्त करण्याचा संवैधानिक हक्क असल्याचे सांगणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे.
ब. आरोपीस न्यायालयासमोर हजर केल्यानंतर/ सुनावणीचे वेळी त्यास वकील आहे किंवा नाही याची न्यायालय चौकशी करुन, आरोपीस वकील नसल्यास तात्काळ शासनामार्फत सरकारी वकीलाची नियुक्ती करतील.